-: प्रेसनोट :- दिनांक : २७/०१/२०२२

यातील फिर्यादी याच्या चुलत भावाला मटक्याच्या गुन्ह्यामध्ये कायदेशीर कारवाई न करण्याकरीता यातील आरोपी लोकसेवक यांनी स्वत:करीता रू. २०,०००/- लाचेची मागणी करून ती मध्यस्थीच्या मार्फतीने स्विकारली म्हणुन गुन्हा नोंद.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०३/२०२२ |
| कलम | कलम-७, १२ भ्र.प्र.कायदा १९८८ |
| आरोपी इसम | १) संजीव होनाजी निंबाळकर वय ५० वर्षे, सहायक पोलीस निरीक्षक, नेमणूक - डोगरी पोलीस ठाणे, मुंबई<br>२) महमद अली वली मनसुरी, वय ४१ वर्षे, (मधस्थ/ खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये २०,०००/- |
| स्विकारलेली लाचेचीरक्कम | रुपये १८,०००/- |
| थोडक्यात माहीती | यातील फिर्यादी यांचा चुलत भाउ यास डोगरी पोलीस ठाणे हददीत रहात असुन गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहितीवरुन यातील आरोपी लोकसेवक यांनी फिर्यादीचा भाउ यास चौकशीकरीता ताब्यात घेवुन त्यांचेजवळ मटक्याच्या आकडयाच्या चिठठी आढळुन आली. याकरीता यातील आरोपीत लोकसेवकाने मध्यस्थीच्या मार्फतीने फिर्यादीकडे त्यांच्या भावावर कारवाई न करण्याकरीता रु.२०,०००/- रक्कमेची मागणी केली. परंतु सदर लाचेची रक्कम यातील आरोपी लोकसेवक यास देण्याची फिर्यादीची इच्छा नसल्याने फिर्यादीने दि.२७/०१/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे लेखी तक्रार दिली.<br>फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आज दि.२७/०१/२०२२ रोजी डोगरी पोलीस ठाणे येथे पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली असता, पडताळणी मध्ये यातील आरोपी लोकसेवकाने फिर्यादी यांचे भावावर मटक्याच्या गुन्ह्यामध्ये कायदेशीर कारवाई न करण्याकरीता मध्यस्थीच्या मार्फतीने २०,०००/- रुपयाची मागणी करुन सदरची रक्कम आणुन देण्यास सांगितल्याने लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले.<br>त्यावरुन आज दि. २७/०१/२०२२ रोजी सापळा कारवाई दरम्यान यातील फिर्यादीकडून तडजोडीअंती रु. १८,०००/- लाचेची रक्कम मधस्थी मार्फतीने स्विकारताना वर नमुद आरोपी लोकसेवक व मध्यस्थी यांना रंगेहात पकडण्यात आले म्हणुन यातील आरोपी लोकसेवक व मध्यस्थी/खाजगी इसम यांचे विरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७, १२ प्रमाणे गुन्हा नोंद. |

( सरदार नाळे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क : लचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८,
वेबसाईट:- acbmaharashtra.gov.in,
ईमेल :- acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईलॲप:- www.acbmaharashtra.net. टोल फ्री नं. १०६४